**मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली राज्यात कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मान्यता देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक : सकाम-२०२२/प्र.क्र. २६४/सामासू
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १ फेब्रुवारी, २०२३

**संदर्भ :** १. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीएसडब्ल्यू. १०९९/प्र.क्र. २३२/सुधार -१ दिनांक १० एप्रिल, २००१

२. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीएसडब्ल्यू. २००२/प्र.क्र. ३६३/भाग-२/सुधार-१ दिनांक २४ ऑगस्ट, २००४

३. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद/नागपूर यांचे न्यायनिर्णय

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत एकूण ५७ समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता देण्यात आलेली असून, त्यापैकी १ बंद व ६ विना अनुदानित तत्वावर कार्यरत आहे. ६ विना अनुदान महाविद्यालयापैकी उर्वरित ५ समाजकार्य महाविद्यालयांना दि. ८ मार्च,२०१९ व दि.५ ऑगस्ट,२०२२ च्या शासन निर्णयान्वये कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करता येणार नाही,या अटीवर मान्यता देण्यात आली आहे.

या विभागांतर्गत एकूण ५० समाजकार्य महाविद्यालय अनुदान तत्वावर कार्यरत आहेत. या सर्व महाविद्यालयाचे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ वरील तरतूदीनुसार संलग्निकरणाची कार्यवाही करण्यात येत असली तरी नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दि.१०/४/२००१ व दि.२४/८/२००४ च्या शासन निर्णयान्वये BSW/MSW या अभ्यासक्रमांना विनाअनुदान किंवा अनुदान तत्वावर मान्यता न देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २०/०७/२०१५ अन्वये नियुक्त केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालानुसार नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेबाबत कविकुलगुरु कालीदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक जि. नागपूर, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांनी

सन २०२०-२१, सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून बीएस डब्ल्यू/एमएसडब्ल्यू या विषयांसाठी नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेबाबत केलेल्या शिफारशीनुसार नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मान्यता देणेबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे शासनाच्या विरुध्द **(१)** श्री. संत दामाजी अप्पा चॅरीटेबल ट्रस्ट आरखेड, ता. पालम जि. परभणी , रिट याचिका क्र. ६५८०/२०२० **(२)** जय भगवती शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद, रिट याचिका क्र.९१६६/२०२१ **(३)** स्व. हरीवंशराय बच्चन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जालना, रिट याचिका क्र.९१५०/२०२१ **(४)** ज्ञानेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ शाहुनगर, जि. बीड, रिट याचिका क्र. ७८१९/२०२१ **(५)** यशवंतराव चव्हाण रुरल डेव्हलपमेंट मिशन, हिंगोली, रिट याचिका क्र.३६७९/२०२१ **(६)** मानव सेवा विकास प्रतिष्ठाण यशवंत नगर, परभणी, रिट याचिका क्र.३६८०/२०२१ **(७)** श्रमसाफल्य बहुउद्देशीय संस्था, जालना, रिट याचिका क्र.१७५७/२०२१ **(८)** गर्भागिरी सोशल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित छत्रपती राजर्षी शाहु महाराज समाजकार्य महाविद्यालय, देऊळगांव घाट ता. आष्टी जि. बीड, रिट याचिका क्र.२८८८/२०२२ **(९)** मोहटादेवी सेवा प्रतिष्ठाण श्रीगोंदा, जि. अहमदनगर, रिट याचिका क्र. ६५८१/२०२० **(१०)** दिशा बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, जालना, याचिका क्र. १०९३८/२०१९ **(११)** दृष्टी बहुउद्देशीय संस्था, राळेगांव, जि.अमरावती **(१२)** राजे बाग सवार शिक्षण संस्था,औरंगाबाद या संस्थांनी याचिका दाखल केल्या होत्या.

यापूर्वी याचिका क्र. २४४४/२०१७ व ४४२२/२०१७ बाबत दि.७ नोव्हेंबर,२०१७ रोजी व याचिका क्र. २४४०/२०१८ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या दि. २०/०७/२०१८ च्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशानुसार मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार दि. ०८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सदर याचिकेतील २ संस्थांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर सदर संस्थांना नवीन समाजकार्य महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यासंदर्भात मा.न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद / नागपूर यांनी दिलेल्या न्यायनिर्णयास अनुसरुन संबंधित १२ संस्थेस कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद/नागपूर खंडपीठाने दिलेल्या न्यायनिर्णयाची पुर्तता करण्यासाठी, पुढील १२ संस्थेस कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापण्यास परिच्छेद २ येथील नमूद अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित समाजकार्य महाविद्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री. संत दामाजी अप्पा चॅरीटेबल ट्रस्ट आरखेड, ता. पालम जि. परभणी | भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी महाविद्यालय, सिंगणापूर, ता.जि. परभणी |
| २ | जय भगवती शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद | भगवती महाविद्यालय, मौजे पांगरी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद |
| ३ | स्व. हरीवंशराय बच्चन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जि. जालना | स्व. राजेंद्रजी श्रीवास्तव महाविद्यालय, पारध . ता. भोकरदन जि. जालना |
| ४ | ज्ञानेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ शाहुनगर, जि. बीड | श्री. ज्ञानदेव लिंबाजी तांबारे, समाजकार्य महाविद्यालय, तागडगाव ता. शिरुर (कासार) जि. बीड |
| ५ | यशवंतराव चव्हाण रुरल डेव्हलपमेंट मिशन, ता.जि.हिंगोली | भारतरत्न नानाजी देशमुख सिनिअर कॉलेज, गोरेगाव ता. सेनगाव जि. हिंगोली |
| ६ | मानव सेवा विकास प्रतिष्ठाण यशवंत नगर, परभणी | शब्दसह्याद्री समाजकार्य महाविद्यालय, जि. परभणी |
| ७ | श्रमसाफल्य बहुउद्देशीय संस्था, जालना | ए.एम. डी. समाजकार्य महाविद्यालय, मंठा रोड जि. जालना |
| ८ | गर्भागिरी सोशल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित छत्रपती राजर्षी शाहु महाराज समाजकार्य महाविद्यालय, देऊळगांव घाट ता. आष्टी जि. बीड | छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजकार्य महाविद्यालय, देऊळगांव (घाट), ता. आष्टी जि. बीड |
| ९ | मोहटादेवी सेवा प्रतिष्ठाण श्रीगोंदा, जि. अहमदनगर | सनराईज महाविद्यालय श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर |
| १० | दिशा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जालना | मातोश्री रमाई समाजकार्य महाविद्यालय बदनापूर, ता. बदनापूर जि. जालना |
| ११ | दृष्टी बहुउद्देशीय संस्था, राळेगांव, जि.अमरावती | ज्ञान विहार समाजकार्य महाविद्यालय आर्वी, ता. आर्वी, जि. वर्धा |
| १२ | राजे बाग सवार शिक्षण संस्था, औरंगाबाद | मराठवाडा समाजकार्य महाविद्यालय, औरंगाबाद. |

२. उपरोक्त **१२** **<u>संस्थांना नवीन समाजकार्य महाविद्यालयाच्या स्थापनेस पुढील अटींच्या अधीन राहून</u>** शासन मान्यता देण्यात येत आहे.

(१) सदर मान्यता ही कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर राहील.

(२) प्रस्तुत बाबतीत युजीसी/अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्ेने (AICTE) विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

(३) शासनाने विहित केलेल्या, युजीसी /अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती संस्थेस मान्य असल्याबाबतचे बंधपत्र शासनास सादर करणे अनिवार्य राहील, ही बाब इरादापत्रात नमूद करण्यात यावी.

(४) उपरोक्त संस्थांकडे वरील महाविद्यालये स्थापन करण्याकरीता स्वत:ची अथवा भाडे तत्वावर घेतलेली इमारत असणे आवश्यक आहे.

(५) विद्यार्थ्यांना युजीसी/अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) व विद्यापीठाव्दारे विहीत केल्यानुसार इतर सर्व आवश्यक सुविधा असणे आवश्यक आहे.

(६) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर शिक्षकेतर कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावेत. सदर महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन व वेतनेतर दायित्व शासनावर असणार नाही.

(७) तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

(८) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबेशन ऑफ रॅगिंग ॲक्ट,१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

(९) उपरोक्त संस्थांनी समाजकार्य विषयाच्या अनुषंगाने सामाजिक संस्थांशी टाय-अप करणे आवश्यक राहील.

(१०) **" नवीन महाविद्यालय/संस्था भविष्यात प्रस्तावित समाजकार्य महाविद्यालयाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही"**, अशा आशयाचे शपथपत्र संबधित संस्थांनी मा. उच्च न्यायालयाकडे सादर करावे व त्याची प्रत शासनाकडे सादर करण्याच्या अटीस अधीन राहून शासन मान्यता देण्यात यावी.

३. समाजकार्य महाविद्यालय स्थापन करण्यासाठी लागणाऱ्या इतर सर्व अटी व शर्ती यांची पूर्तता उपरोक्त संस्थांनी केली आहे, याची खात्री आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी करावी.

४. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपरोक्त बारा समाजकार्य महाविद्यालयास मान्यता देण्यात येत असल्याने, शासनाच्या धोरणात कोणतेही बदल नाही.यास्तव संदर्भाधीन क्रमांक १ व २ येथील अनुक्रमे दि. १०.०४.२००१ व दि. २४.०८.२००४ रोजीचे शासन निर्णय यापुढेही लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि. ३१ जानेवारी,२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक 202302021205079022असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रो.ना.सवने)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
७. सर्व अधिदान व लेखा अधिकारी
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११.आयुक्त, समाजकल्याण, पुणे
१२.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४.सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
१५.सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१६.अध्यक्ष, श्री. संत दामाजी अप्पा चॅरीटेबल ट्रस्ट आरखेड, ता. पालम जि. परभणी ,
१७.अध्यक्ष, जय भगवती शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद
१८. अध्यक्ष, स्व. हरीवंशराय बच्चन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जालना
१९.अध्यक्ष, ज्ञानेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ शाहुनगर, जि. बीड
२०.अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण रुरल डेव्हलपमेंट मिशन, हिंगोली
२१.अध्यक्ष, मानव सेवा विकास प्रतिष्ठाण यशवंत नगर, परभणी

२२.अध्यक्ष, श्रमसाफल्य बहुउद्देशीय संस्था, जालना

२३.अध्यक्ष, गर्भागिरी सोशल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित छत्रपती राजर्षी शाहु महाराज समाजकार्य महाविद्यालय, देऊळगांव घाट ता. आष्टी जि. बीड

२४.अध्यक्ष, मोहटादेवी सेवा प्रतिष्ठाण श्रीगोंदा, जि. अहमदनगर

२५.अध्यक्ष, दिशा बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, जालना

२६.अध्यक्ष, दृष्टी बहुउद्देशीय संस्था, वर्धा

२७.अध्यक्ष, राजे बाग सवार शिक्षण संस्था, औरंगाबाद

२८. निवडनस्ती.

---